## महाराष्ट्र शासन

क्रमांक : अधापु-२०१२/प्र. क्र. २७३/नापु-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१३.

प्रति,

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई
२) जिल्हाधिकारी (नागपूर/अमरावती/अकोला/वाशिम/बुलढाणा/यवतमाळ/नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर/औरंगाबाद/परभणी/बीड/नांदेड/उस्मानाबाद/लातूर)
३) जिल्हा पुरवठा अधिकारी (नागपूर/अमरावती/अकोला/वाशिम/बुलढाणा/यवतमाळ/नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर/औरंगाबाद/परभणी/बीड/नांदेड/उस्मानाबाद/ लातूर)

**विषय :- लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत १८ जिल्ह्यांतील बीपीएल व एएवाय लाभार्थ्यांसाठी माहे मार्च,२०१३ करिता ज्वारीचे मासिक नियतन व गव्हाचे सुधारित मासिक नियतन.**

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे पत्र क्र.१-१/२०१२-बीपी-III(१६), दि.१२.०३.२०१२.
२) शासनपत्र क्रमांक अधापु-२०१२/प्र. क्र.३२ /नापु-२२ दि.२१.०३.२०१२.
३) केंद्र शासनाचे पत्र क्र.२ / Maharashtra / २०१२ - BP - III,दि.१८.१२.२०१२
४) केंद्र शासनाचे पत्र क्र.१-३/२०११-BP-III, दि.११ फेब्रुवारी, २०१३.

केंद्र शासनाच्या दि.१२.०३.२०१२च्या पत्रान्वये मंजूर केलेल्या नियतनास अनुसरुन राज्य शासनाने दि.२१.०३.२०१२ च्या पत्रान्वये एपीएल, बीपीएल व अंत्योदय योजनेअंतर्गत माहे एप्रिल, २०१२ ते मार्च, २०१३ या कालावधीकरिता अन्नधान्याचे जिल्हानिहाय मासिक नियतन मंजूर केले आहे.

आता केंद्र शासनाने त्यांच्या दि.११.०२.२०१३ च्या पत्रान्वये माहे फेब्रुवारी, २०१३ व मार्च, २०१३ करिता बीपीएल व एएवाय लाभार्थ्यांसाठी ज्वारीचे मासिक नियतन मंजूर केले आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०१२-१३ मध्ये ज्वारीची खरेदी झालेली आहे तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरणासाठी ज्वारीची मागणी आहे अशा मुंबई/ नागपूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगाव/ अहमदनगर/ औरंगाबाद/ परभणी/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर या १८ जिल्ह्यांतील बीपीएल व एएवाय लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी दरमहा १० कि. ग्रॅ. या परिमाणात सदर ज्वारीचे वितरण करावयाचे आहे. तथापि यापूर्वीच्या दि. २१.३.२०१२ च्या शासन पत्रान्वये मंजूर केलेल्या गव्हाच्या नियतनाच्या प्रमाणात बदल करून त्याच प्रमाणात ज्वारीचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. यानुसार उपरोक्त १८ जिल्ह्यांकरिता माहे मार्च, २०१३ करिता ज्वारीचे मासिक नियतन व गव्हाचे सुधारित मासिक नियतन सोबतच्या विवरणपत्रात

दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. म्हणजेच उपरोक्त १८ जिल्हा / क्षेत्रिय कार्यालयांसाठी सन २०१२-१३ मधील एप्रिल, २०१२ ते फेब्रुवारी, २०१३ या कालावधीसाठी दि. २१.३.२०१२ च्या पत्रान्वये मंजूर केलेले गव्हाचे नियतन लागू असेल तर माहे मार्च, २०१३ या महिन्याकरिता सोबतच्या **विवरणपत्र "अ"** मध्ये दर्शविण्यात आलेले गव्हाचे नियतन लागू असेल. इतर जिल्ह्यांकरिता दि. २१.०३.२०१२ च्या पत्रान्वये दिलेले नियतन कायम राहील.

सदर ज्वारी वितरीत करण्याचे दर पुढीलप्रमाणे राहतील :-

| ज्वारीचे प्रस्तावित विक्री दर (प्रती किलो) (रुपये) | | |
|---|---|---|
| | बीपीएल | एएवाय |
| केंद्रिय विक्री दर | ३.०० | १.५० |
| बर्हिगोदाम दर | ३.३५ | १.०० |
| किरकोळ दर | ३.८५ | १.५० |
| दुकानदारांचे मार्जिन | ०.५० | ०.५० |

माहे मार्च, २०१३ च्या सुधारित धान्य नियतनाची रक्कम जमा करणे व धान्याची उचल करण्याकरिता वैधता कालावधी (Validity Period) केंद्र शासनाच्या पत्राच्या दिनांकापासून (दि.११.०२.२०१३ पासून) ५० दिवसांचा असेल. सदर ज्वारीची उचल कोणत्या जिल्ह्यातून करण्यात यावी याबाबतचा तपशील विरिणपत्र "ब" मध्ये दर्शविण्यात आला आहे. **असेही नमूद करण्यात येते की, ज्वारीची खरेदी अद्यापही सुरु असल्याने ज्या जिल्ह्यांकडे सदर आदेशानुसार वितरीत केल्यानंतर खरेदी केलेली ज्वारी शिल्लक असेल त्या जिल्ह्याने विवरणपत्र "ब" मध्ये दर्शविल्यानुसार इतर जिल्ह्यातून ज्वारीची उचल न करता प्रथम त्याच जिल्ह्यातील शिल्लक ज्वारीतून उचल करावी व तद्नंतर गरजेनुसार विवरणपत्र "ब" मध्ये दर्शविलेल्या जिल्ह्यातून ज्वारीची उचल करावी.**

याव्यतिरिक्त संदर्भाधिन दि.२१.०३.२०१२ च्या शासन पत्रान्वये दिलेल्या सूचना सदर सुधारीत नियतनाकरितादेखील कायम राहतील.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०३०१११२२१६०९०६ असा आहे.

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

सोबत :- (विवरणपत्र "अ" व "ब")

प्रत :

१) सर्व उप आयुक्त (पुरवठा) (फॅक्सद्वारे)

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्ह्यांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्ह्यांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत दर आठवड्यात भरली जाण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

प्रस्तुत नियतनानुसार जिल्ह्यांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावा.

४) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

५) कार्यासन अधिकारी (नापु-२८), मंत्रालय, मुंबई यांना केंद्र शासनाच्या मूळ पत्राच्या प्रतीसह पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

६) निवडनस्ती कार्यासन नापु-२२, मंत्रालय, मुंबई.

**( हेमंत वाडीकर )**
कक्ष अधिकारी

सोबत : (विवरणपत्र "अ" व "ब")

# Monthly Allocation of Jowar for BPL and AAY Category Annexture "A"

| SR.NO. | Districts | No. of Card holders | | | Quantum of Jowar (per card per month) | Jowar Allocation (MT) | | | Original Wheat Allocation | | | Revised Wheat Allocation | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | BPL | AAY | Total | | BPL | AAY | Total | BPL | AAY | Total | BPL | AAY | Total |
| 1 | MUMBAI | 30612 | 18728 | 49340 | 10 | 291 | 193 | 484 | 291 | 198 | 489 | 0 | 5 | 5 |
| 2 | NASIK | 291618 | 178973 | 470591 | 10 | 2842 | 1842 | 4684 | 5546 | 3634 | 9180 | 2704 | 1792 | 4496 |
| 3 | DHULE | 139949 | 75482 | 215431 | 10 | 1365 | 777 | 2142 | 2662 | 1533 | 4195 | 1297 | 756 | 2053 |
| 4 | NANDURBA | 104720 | 90538 | 195258 | 10 | 996 | 932 | 1928 | 996 | 951 | 1947 | 0 | 19 | 19 |
| 5 | JALGAON | 201812 | 130748 | 332560 | 10 | 1967 | 1346 | 3313 | 3838 | 2654 | 6492 | 1871 | 1308 | 3179 |
| 6 | AHMEDNA | 246574 | 93195 | 339769 | 10 | 2403 | 959 | 3362 | 4690 | 1892 | 6582 | 2287 | 933 | 3220 |
| 7 | AURANGAI | 182037 | 80536 | 262573 | 10 | 1775 | 829 | 2604 | 3462 | 1635 | 5097 | 1687 | 806 | 2493 |
| 8 | PARBHANI | 73017 | 46010 | 119027 | 10 | 713 | 473 | 1186 | 1389 | 934 | 2323 | 676 | 461 | 1137 |
| 9 | BEED | 249260 | 48869 | 298129 | 10 | 2429 | 503 | 2932 | 4741 | 992 | 5733 | 2312 | 489 | 2801 |
| 10 | NANDED | 139237 | 78767 | 218004 | 10 | 1358 | 811 | 2169 | 2648 | 1599 | 4247 | 1290 | 788 | 2078 |
| 11 | OSMANAB | 104533 | 43855 | 148388 | 10 | 1020 | 451 | 1471 | 1988 | 890 | 2878 | 968 | 439 | 1407 |
| 12 | LATUR | 87733 | 44570 | 132303 | 10 | 856 | 459 | 1315 | 1669 | 905 | 2574 | 813 | 446 | 1259 |
| 13 | AMRAVATI | 169648 | 127364 | 297012 | 10 | 1654 | 1311 | 2965 | 3227 | 2586 | 5813 | 1573 | 1275 | 2848 |
| 14 | AKOLA | 91256 | 48082 | 139338 | 10 | 891 | 495 | 1386 | 1736 | 976 | 2712 | 845 | 481 | 1326 |
| 15 | WASHIM | 70692 | 43447 | 114139 | 10 | 690 | 447 | 1137 | 1345 | 882 | 2227 | 655 | 435 | 1090 |
| 16 | BULDHANA | 142215 | 75128 | 217343 | 10 | 1387 | 773 | 2160 | 2705 | 1525 | 4230 | 1318 | 752 | 2070 |
| 17 | YAVATMAL | 132331 | 113759 | 246090 | 10 | 1291 | 1171 | 2462 | 2517 | 2310 | 4827 | 1226 | 1139 | 2365 |
| 18 | NAGPUR | 130381 | 99856 | 230237 | 10 | 1272 | 1028 | 2300 | 2480 | 2027 | 4507 | 1208 | 999 | 2207 |
| TOTAL | | 2587625 | 1437907 | 4025532 | | 25200 | 14800 | 40000 | 47930 | 28123 | 76053 | 22730 | 13323 | 36053 |

## Annexture "B"

| SR.NO. | Districts | Jowar Allocation (MT) | | | Districts from which allocation can be made available | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | BPL | AAY | Total | District | Quantity (MT) | District | Quantity (MT) | Total Quantity (MT) |
| 1 | MUMBAI | 291 | 193 | 484 | Dhule | 484 | | | 484 |
| 2 | NASIK | 2842 | 1842 | 4684 | Jalgaon | 4684 | | | 4684 |
| 3 | DHULE | 1365 | 777 | 2142 | Dhule | 2142 | | | 2142 |
| 4 | NANDURB/ | 996 | 932 | 1928 | Nandurbar | 1928 | | | 1928 |
| 5 | JALGAON | 1967 | 1346 | 3313 | Jalgaon | 3313 | | | 3313 |
| 6 | AHMEDNA | 2403 | 959 | 3362 | Jalgaon | 3362 | | | 3362 |
| 7 | AURANGAI | 1775 | 829 | 2604 | Aurangabad | 40 | Jalgaon | 2564 | 2604 |
| 8 | PARBHANI | 713 | 473 | 1186 | Parbhani | 1186 | | | 1186 |
| 9 | BEED | 2429 | 503 | 2932 | Beed | 1678 | Jalgaon | 1254 | 2932 |
| 10 | NANDED | 1358 | 811 | 2169 | Nanded | 253 | Akola | 1916 | 2169 |
| 11 | OSMANAB | 1020 | 451 | 1471 | Osmanabad | 1065 | Akola | 406 | 1471 |
| 12 | LATUR | 856 | 459 | 1315 | Latur | 293 | Akola | 1022 | 1315 |
| 13 | AMRAVATI | 1654 | 1311 | 2965 | Amravati | 2965 | | | 2965 |
| 14 | AKOLA | 891 | 495 | 1386 | Akola | 1386 | | | 1386 |
| 15 | WASHIM | 690 | 447 | 1137 | Washim | 493 | Akola | 644 | 1137 |
| 16 | BULDHANA | 1387 | 773 | 2160 | Buldhana | 2160 | | | 2160 |
| 17 | YAVATMAL | 1291 | 1171 | 2462 | Yavatmal | 28 | Amravati | 2434 | 2462 |
| 18 | NAGPUR | 1272 | 1028 | 2300 | Nagpur | 223 | Amravati | 2077 | 2300 |
| **TOTAL** | | **25200** | **14800** | **40000** | | **27683** | | **12317** | **40000** |